# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/09/2023 (शुक्रवार) दुपार

## घरफोडीचा प्रयत्न

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत ०४ कि.मी. अंतरावरील मौजा भारासिंगी येथे दिनांक १४/०९/२०२३ चे १८.०० वा. ते दिनांक १५/०९/२०२३ चे ०७.४५ वा. दरम्यान यातील अज्ञात आरोपीतांनी बॅक आफ इंडीया शाखा भारसिंगी येथील बॅकेची पठीमागील भिंत फोडुन आत मध्ये प्रवेश करून बॅक मधील असलेले स्ट्रॉग रूम मधील लोखंडी आलमारी कटरने फोडण्याचा प्रयत्न केला परंतु सदर आलमारी मधील कोणतीही रोख रक्कम दाग दागिने चोरी गेले नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– किरण पराग तुरखडे, वय ३४ वर्ष, रा. जानकीनगर काटोल यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८०, ५११ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक मनोज चौधरी पोलीस स्टेशन जलालखेडा मो. नं. ८९७५७५५९६९ हे करीत आहे.

## नागपूर ग्रामीण जिल्हयाची अवैध धंदयाविरूद्ध विशेष मोहीम

पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो. से.) यांनी आगामी पोळा व गणेशोत्सव सणादरम्यान अवैद्य दारूविरूद्ध विशेष मोहीम सुरू केलेली असुन सदरची मोहीम दिनांक ०६/०९/२०२३ पासुन सुरू करण्यात आली आहे. सदर मोहीमेदरम्यान आजपावेतो ०९ दिवसात नागपूर ग्रामीण जिल्हयात १८८ आरोपीतांवर कार्यवाही करण्यात आलेली असुन जवळपास एकुण ८८१०९०/–रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदरची मोहीम अशीच गणेश विसर्जन पर्यंत सुरू ठेवण्यात येणार असुन पोळा व गणपती दरम्यान गुन्हेगारांवर विविध कलमान्वये प्रभावी प्रतिबंधक कार्यवाही सुद्धा करणार असल्याचे तसेच अवैध धंदयाचे समुळ नष्ट करण्याचे पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो. से.) यांनी सांगितले.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर